# शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश

**मुंबई (प्रतिनिधी)**– राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ यांच्यामध्ये 'व्यवसाय शिक्षणाच्या नवकल्पने'चा समावेश आहे. त्या अंतर्गत चालू शैक्षणिक वर्षी इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमामध्ये कार्य शिक्षण या विषयांतर्गत कृषी शिक्षणाचा समावेश करण्यात आलेला आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने इयत्ता दहावीपर्यंतच्या अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी शुक्रवारी दिली.

शालेय अभ्यासक्रमात कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत काल मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत बोलताना भोयर म्हणाले, शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२५ चे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. या नवीन अभ्यासक्रमामध्ये वय वर्षे ३ ते ८ मधील विद्यार्थ्यांना कार्य शिक्षण या विषयांतर्गत २१ व्या शतकातील महत्वपूर्ण कौशल्ये, तसेच कृषी, पर्यटन व्यावसायिकतेचा पाया सुरुवातीपासून घातला जाईल, अशा उपक्रमांची मांडणी करावी. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती रुजवण्यासाठी स्थानिक सण, समारंभ, परंपरा, कला, पिके, भौगोलिक रचना, उपलब्ध साधन सामग्री यांचाही विचार कार्य शिक्षण विषयाच्या उपक्रमाची मांडणी करताना करावा. भारतातील शेतीचे महत्व, कृषि क्षेत्रातील गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान या सर्व बाबींचा विचार करता नव्या पिढीची नाळ कृषी क्षेत्राशी जोडण्यासह कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा विस्तार होण्यासाठी माती, पाणी, नैसर्गिक संसाधने, वनस्पती, स्थानिक पशुपक्षी या विषयातील नवीन उपक्रम अभ्यासक्रमात सुचविण्यात यावेत, अशी सूचना पंकज भोयर यांनी केली.

इयत्ता ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना परसबाग, सेंद्रिय शेती, तृणधान्य उत्पादन, अन्न प्रक्रिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, बांबूचा वापर, पाळीव प्राण्यांचे पोषण, कुक्कुट पालन, पर्यटन आणि आदरातिथ्य, जल व्यवस्थापनासाठी पाण्याचे लेखापरीक्षण, जैवविविधता नोंदणी, इंधनविरहीत स्वयंपाक इत्यादी विषय उपलब्ध करून देण्यात यावेत. शेतीसारख्या परंपरागत विषयात नवीन तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करून देत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साधनांचा उपयोग कसा करावा याचा अभ्यासक्रमात सहभाग असावा, असेही भोयर यांनी सांगितले.

# अन्नपाण्याविना संकरीत वासरांनी फोडला टाहो

## माळवाडगाव येथील आंदोलनातील घटना



**माळवाडगाव (वार्ताहर)**– शेतकरी संघटनेच्या वतीने २५ सप्टेंबर रोजी माळवाडगाव तलाठी कार्यालयासमोर भाकड संकरित जनावरे सरकारकडे जमा करण्याच्या पुकारलेल्या आंदोलनात पशुपालकांनी पन्नास संकरीत वासरे जमा केली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष, व तालुकाध्यक्ष यांनी फोटो काढले. भाषण दिले. आणि स्थानिक एका पदाधिकाऱ्यावर जबाबदारी सोपवून निघून गेले. त्यानंतर वासराचे पालकही आपापल्या घरी निघून गेले. शासनाने ही संकरित वासरे ताब्यात घेण्यास स्पष्ट नकार दिल्याने अन्न-पाणी विना ग्रामपंचायत, तलाठी कार्यालयासमोर दुसऱ्या दिवशी संकरित वासरांनी टाहो फोडून एकप्रकारे ग्रामस्थांसमोर भावनिक आंदोलन केले.

शेतकरी संघटनेने तालुका स्तरावरून गाव पातळीवर सर्कल ग्रुप गावांपैकी एक गाव निवडून कर्जमुक्ती व भाकड जनावरे जमा आंदोलन सुरू केले. माळवाडगावमधील या आंदोलनाची जबाबदारी येथील शेतकरी संघटनेचे युवा आघाडी अध्यक्ष शरद आसने यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांनी तहसिलदार, पंचायत समिती, तालुका पोलीस ठाणे यांना आंदोलनाची २५ सप्टेंबर तारीख निश्चित करत रितसर निवेदन दिले. खानापूर, मुठेवाडगाव, भामाठाण, माळवाडगाव येथील शेतकऱ्यांना भाकड संकरीत वासरे आंदोलन स्थळी जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनानुसार तब्बल ५० हून अधिक संकरीत वासरे गोपालकांनी आणून सोडले. जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, तालुकाध्यक्ष जगताप यांच्यासह परिसरातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली. प्रमुखांची भाषणे होऊन कामगार तलाठी यांच्याशी चर्चा झाली आणि आंदोलन यशस्वी झाले.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर असल्याने ग्रामपंचायतने पंचायत समितीकडे, तर कामगार तलाठी यांनी तहसिलदार कार्यालयाकडे रिपोर्ट करून संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्याप्रमाणे तेही निघून गेले. ज्यांच्यावर जबाबदारी सोडली होती, त्यांना वाटले की, सायंकाळपर्यंत तालुक्याहून शासनाची गाडी येऊन वासरे उचलून नेतील. कुणीही न आल्याने संयोजकाने पुन्हा वासराच्या पालकस मोबाईलवरून वासरासाठी दूध आणण्यास सांगितले. ही दया सर्वांना न येता निम्म्या अर्ध्याच पशुपालकांना आली.

सकाळ होताच ज्यांना रात्री दूध मिळाले नाही, अशा कोवळ्या वासरांनी टाहो फोडून ओरडण्यास सुरूवात केली. त्यांच्या सुरात अन्य वासरांनी टाहो फोडल्याने एकच गोंधळ उडाला. परिसरात देवी मंदिरासमोर नवरात्र उत्सव पारायण सुरू असल्याने तान्ह्या जीवाची तळमळ पाहून महाराज मंडळींनीही तीव्र नाराजी व्यक्त केली. या आंदोलनाची जबाबदारी घेणारे शरद आसने ग्रामस्थ व अधिकाऱ्यांसमोर एकटे पडले. अखेर त्यांनी ॲड. अजित काळे यांना गावातील हा प्रकार तातडीने निवारण करण्यास सांगितले. ॲड. अजित काळे यांनी पंचायत समिती, तहसिलदार यांच्याशी कायदेशीर मार्गाने तातडीने पत्रव्यवहार करून मार्ग काढला. आणि अखेर संकरीत वासरे गोशाळेत पाठविण्यात आली.

# हायकोर्ट म्हणाले- समान नागरी कायदा काळाची गरज

## पर्सनल लॉमध्ये बालविवाहाला परवानगी, परंतु पोस्कोअंतर्गत तो गुन्हा

**नवी दिल्ली**– दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी देशात समान नागरी संहिता लागू करण्याची बाजू मांडली. न्यायालयाने असे नमूद केले की पर्सनल लॉ बालविवाहाला परवानगी देतो, परंतु पोस्को कायदा आणि यूसीसी त्याला गुन्हेगार ठरवतात. या कायद्यांमधील वारंवार होणारे संघर्ष लक्षात घेता, स्पष्ट कायदेशीर व्याख्या आवश्यक आहे.

न्यायमूर्ती अरुण मोंगा यांनी विचारले की, बऱ्याचदा आपल्याला असा पेच पडतो की, दीर्घकाळापासून चालत आलेल्या पर्सनल लॉं चे पालन केल्याबद्दल समाजाला गुन्हेगार ठरवावे का? न्यायमूर्ती मोंगा यांनी विचारले की, पर्सनल लॉसारखे कायदे राष्ट्रीय कायद्यांना मागे टाकू नयेत म्हणून एक चौकट तयार करून, यूसीसीकडे वाटचाल करण्याची वेळ आली आहे का? अल्पवयीन मुलीशी लग्न केल्याचा आरोपी हामीद रझा याच्या जामीन अर्जाशी संबंधित प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान दिल्ली उच्च न्यायालयाची ही टिप्पणी आली. अल्पवयीन मुलीशी लग्न केल्याबद्दल हमीदवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याअंतर्गत आरोप आहे. मुलीच्या सावत्र वडिलांनी रझाविरुद्ध एफआयआर दाखल केला होता.

## हेमलता हेंद्रे यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– शहरातील पूर्णवादनगर येथील सौ. हेमलता प्रकाश हेंद्रे यांचे नुकतेच निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, दोन मुली, भाऊ, पुतणे, पुतणी, नातवंडे असा परिवार आहे. कृष्णा प्रकाश हेंद्रे यांच्या त्या मातोश्री होत.

# विधवा व निःसंतान महिलेच्या संपत्तीवर सासरच्यांचा हक्क

**नवी दिल्ली**– सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी म्हटले की, हिंदू समाजात कन्यादानाची परंपरा आहे, ज्या अंतर्गत लग्न झाल्यावर महिलेचे गोत्र (कुळ किंवा वंश) बदलते. त्यामुळे, मृत्युपत्राशिवाय मृत्युमुखी पडणाऱ्या विधवा आणि संतानहीन हिंदू महिलेची मालमत्ता तिच्या पालकांना नाही तर तिच्या पतीच्या कुटुंबाला जाईल.

सर्वोच्च न्यायालयात हिंदू उत्तराधिकार कायदा, १९५६ च्या कलम १५(१) (ब) ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी सुरू होती. या कायद्यानुसार, जर एखाद्या विधवा आणि संतानहीन हिंदू महिलेचा मृत्यू मृत्युपत्र न करता झाला तर तिची मालमत्ता तिच्या सासरच्यांना जाते.

याचिकेवरील सुनावणी-दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या एकमेव महिला न्यायाधीश न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना म्हणाल्या, आपल्या हिंदू समाजाच्या विद्यमान रचनेला कमकुवत करू नका. महिलांचे हक्क महत्त्वाचे आहेत, परंतु सामाजिक रचना आणि महिलांच्या हक्कांमध्ये संतुलन असले पाहिजे.

सर्वोच्च न्यायालयाला दोन प्रकरणांची माहिती देण्यात आली. पहिल्या प्रकरणात, एका तरुण जोडप्याचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला. त्यानंतर, पती-पत्नीच्या आईने त्यांच्या मालमत्तेवर दावा केला.

एकीकडे, त्या पुरूषाची आई दावा करते की तिला जोडप्याच्या संपूर्ण मालमत्तेवर हक्क आहे, तर महिलेची आई तिच्या मुलीच्या संचित संपत्तीवर आणि मालमत्तेवर हक्क इच्छिते.

दुसऱ्या एका प्रकरणात, एका जोडप्याच्या मृत्यूनंतर, त्या माणसाची बहीण त्यांच्या मागे राहिलेल्या मालमत्तेवर दावा करत आहे. या जोडप्याला मुले नव्हती. वकिलाने सांगितले की हा सार्वजनिक हिताचा विषय आहे आणि त्यात सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक आहे.

याचिकाकर्त्यातर्फे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी असा युक्तिवाद केला की, १९५६ च्या हिंदू उत्तराधिकार कायद्यातील काही तरतुदी महिलांविरुद्ध भेदभाव करणाऱ्या आहेत. सिब्बल म्हणाले की, केवळ परंपरांमुळे महिलांना समान वारसा हक्क नाकारता येणार नाहीत. केंद्राकडून बाजू मांडणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के. एम. नटराज यांनी या कायद्याचा बचाव केला आणि म्हटले की हा कायदा विचारपूर्वक तयार करण्यात आला आहे आणि याचिकाकर्त्यांना सामाजिक रचना नष्ट करायची आहे असा आरोप केला.

# 'अशोक' चे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी कारखाना करावे- पानसरे

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– अशोक सहकारी साखर कारखान्याचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी साखर कारखाना करून कार्यस्थळावर अहिल्यादेवी होळकरांचा पूर्णाकृती पुतळा बसवावा, अशी मागणी धनगर आरक्षण कृती समितीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पानसरे यांच्यासह अन्य धनगर बांधवांनी केली आहे.

कारखान्याचे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालकांना दिलेल्या निवेदनात पानसरे यांनी म्हटले की, कारखान्याचे २५ टक्क्यांहून अधिक धनगर समाजाचे सभासद आहेत. कारखान्याचे कार्यस्थळ असलेल्या निपाणीवाडगावात मोठ्या प्रमाणात धनगर समाज आहे. हा कारखाना देखील धनगर समाजाच्या जागेवर उभा आहे. कारखान्याच्या उभारणीपासून आजपर्यंतच्या जडणघणीत धनगर समाजाचा वाटा मोलाचा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी या मूळच्या याच जिल्ह्यातील चौंडीतील माहेरवाशिणी आहेत. त्यांचे कर्तृत्व अलौकीक आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे केवळ देशातच नव्हेतर जगभरात कौतूक होते. त्यांचे शौर्य आणि कर्तृत्वाची दखल घेत शासनाने अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर केले. त्यामुळे अशोक कारखान्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी सहकारी साखर कारखाना असे नामकरण करून उचित सन्मान करावा. तसेच कार्यस्थळावर त्यांचा पूर्णाकृती पूतळा उभारून समाजाची अनेक वर्षांची मागणी पूर्ण करावी अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, अशोक कारखान्याची सर्वसाधारण सभा २९ सप्टेंबर रोजी होत आहे. यावेळी धनगर समाज बांधवांनी घोंगडी आणि काठी घेऊन सभास्थळी संचालक मंडळास यासंदर्भातील मागणीचे निवेदन देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहनही पानसरे यांनी केले आहे.

# शंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघाची वार्षिक सभा खेळीमेळीत



**कोपरगाव (प्रतिनिधी)**– तंत्रज्ञान वेगाने विकसित होत असल्याने सहकाररत्न शंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघाला बदलत्या परिस्थितीत थेट शेतकऱ्यांना घरपोहोच सेवा देऊन काळानुरूप पावले टाकावी लागतील, असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी केले. शेतकरी केंद्रस्थानी ठेवून त्याच्या प्रगतीत सातत्याने भर घालावी लागेल, असेही ते म्हणाले.

सहकाररत्न शंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी कोपरगांव येथे खेळीमेळीत पार पडली. प्रारंभी संघाचे अध्यक्ष अंबादास देवकर यांनी स्वागत केले, उपाध्यक्ष वेणुनाथ मांजरे यांनी अहवाल वाचन केले. व्यवस्थापक आर. एन. रक्ताटे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम केले.

बिपीन कोल्हे म्हणाले, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आदी कंपन्या ऑनलाईन पद्धतीने थेट ग्राहकापर्यंत माल पुरवितात; त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी बदलत्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या स्पर्धेसह आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शेतकरी सहकारी संघास सतत पाठबळ दिले. आधुनिक तंत्रज्ञानाचा बदल आत्मसात केला, जागतिक स्तरावरील बदलांचा अभ्यास करून त्यानुसार ध्येयधोरणे ठरवण्यात इफकोचे संचालक विवेक कोल्हे हे देखील पुढाकार घेतात.

यावेळी कोल्हे कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, साई संजीवनी बँकेचे अध्यक्ष शरद थोरात, विश्वासराव महाले, अरुण येवले, शिवाजी वक्ते, मनेष गाडे, सतीश आव्हाड, डॉ. गुलाबराव वरकड, अप्पासाहेब दवंगे, ज्ञानदेव औताडे, बाळासाहेब वक्ते, ज्ञानेश्वर परजणे, मच्छिंद्र लोणारी, राजेंद्र परजणे, प्रदीप नवले, रमेश औताडे, शेतकरी सहकारी संघाचे संचालक संभाजी गावंड, प्रकाश सांगळे, विलास कुलकर्णी, बबनराव निकम, नानासाहेब थोरात, रावसाहेब थोरात, विठ्ठल कोल्हे, रामदास शिंदे, रघुनाथ फटांगरे, देविदास हुडे, हिरालाल गायकवाड, प्रमिला बडे, ताई लोंढे यांच्यासह सभासद, शेतकरी, कार्यकर्ते उपस्थित होते. भिवराज जावळे यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष वेणुनाथ मांजरे यांनी आभार मानले.

# पान १ वरुन

## जिल्ह्यात आज आणि उद्या...

१७१.७ टक्के, शेवगाव तालुक्यात १४७.२ टक्के झालेला आहे. उर्वरित तालुक्यात पावसाची सरासरी ही १०० टक्क्यांच्या पुढे आहे. दरम्यान जिल्ह्यात १३ ते २६ सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टी, पूर तसेच तसेच वीज पडून पाच नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यात पाथर्डी तालुक्यातील सर्वाधिक ३, नगर व शेवगाव तालुक्यातील प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तसेच अतिवृष्टीने जिल्ह्यातील ५९० घरांची पडझड झाली असून सर्वाधिक पडझड जामखेड तालुक्यात १६१ घरांची झाली आहे. तर नेवासा तालुक्यात १३४, कर्जत ६५, नगर ७, पारनेर १४, पाथर्डी ६८, राहुरी ४२, संगमनेर १०, शेवगाव ५९, श्रीगोंदा ४, श्रीरामपूर १६ व राहाता तालुक्यातील १० घरांची पडझड झाल्याचे अहवालात दिसून येते. शिवाय अतिवृष्टीने पशुधनाचीही मोठी हानी झाली आहे. यात मोठे दुधाळ ६८ व लहान ११५ जनावरे असे १८३ जनावरे दगावली आहेत. यात सर्वाधिक पाथर्डी तालुक्यात ११७, नगर तालुक्यात ५, जामखेड २८, कर्जत ८, नेवासा ८, पारनेर ५, राहुरी ३ व संगमनेर ९ जनावरांचा समावेश आहे. तसेच ३८ जनावरांचे गोठ्यांचे नुकसान झाले आहे. यामध्ये जामखेड तालुक्यातील ३६ तर पाथर्डी व राहुरी तालुक्यातील प्रत्येकी एका गोठ्याचा समावेश आहे. अतिवृष्टीने आलेल्या पुरात ८७३ घरांत पुराचे पाणी शिरले होते. यामध्ये सर्वाधिक जामखेड तालुक्यातील ४४० कुटुंबांना फटका बसला आहे. तसेच शेवगाव तालुक्यात १८५, पाथर्डी १६० आणि नेवासा तालुक्यातील ८८ घरांत पाणी शिरले होते.

## पावसामुळे एमपीएससीची उद्या...

उपकेंद्रांवर घेण्यात येणार होती. तथापिः राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या पूरजन्य परिस्थितीमुळे अनेक जिल्ह्यातील विविध गांवाचा, तालुक्यांचा एकमेकांशी संपर्क तुटलेला आहे.

राज्यातील हवामान खात्याने पुढील काही दिवसांत अतिवृष्टीचा इशारा दिला असून अशा परिस्थितीत कोणताही उमेदवार परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी शासनाने पत्र क्रमांक मलोआ-११२५/प्र.क्र.२३६/मलोआ, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ अन्वये केलेल्या विनंतीनुसार प्रस्तुत परीक्षा नियोजित तारखेस न घेता पुढे ढकलण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

सदर निर्णयानुसार महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ , दिनांक २८ सप्टेंबर,२०२५ ऐवजी सुधारित दिनांकास म्हणजेच दिनांक ९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घेण्यात येईल. उपरोक्त परीक्षेच्या दिनांकातील बदलामुळे दिनांक ९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणारी पूर्वनियोजित महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ चा सुधारित दिनांक शुद्धिपत्रकाद्वारे स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

**विद्यार्थ्यांना तयारीसाठी वेळ मिळणार**

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत एकूण ३८५ पदांच्या भरतीसाठी ही परीक्षा घेण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील जवळपास ३ लाख विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी जीवतोड मेहनत घेतलेली आहे, अशातच आता या परीक्षेच्या तयारीसाठी आणखी एक ते दीड महिना मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यालय...

डॉ. आशिया म्हणाले, पावसामुळे ज्या भागातील बंधारे व पाझर तलाव नुकसानग्रस्त झाले आहेत, त्यांची तातडीने दुरुस्ती करावी. यासाठी आवश्यक यंत्रे व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे. आवश्यकता भासल्यास इतर जिल्ह्यातून किंवा स्वयंसेवी संस्थांकडून उपलब्ध असलेली यंत्रे वापरून काम प्राधान्याने पूर्ण करावे. जिल्ह्यात ज्या ठिकाणच्या पूलांमध्ये नुकसान झाले आहे किंवा पुलांचे कठडे तुटले आहेत, ती दुरुस्त करून वाहतुकीला अडथळा येऊ नये, याची काळजी घ्यावी. संपर्क तुटलेल्या गावांचा संपर्क लवकरात लवकर सुधारावा.

आपत्तीच्या काळात गावांमधील वीज पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी दक्षता घेणे आवश्यक आहे. पुरामुळे प्रभावित झालेल्या गावठाण फीडर तातडीने दुरुस्त कराव्यात. तसेच पाणीपुरवठा योजना अखंडित राहील याचीही खात्री करावी. पावसामुळे पाणी पुरवठ्याच्या लाईन्स बाधित झाल्यास त्यांची दुरुस्ती करावी. प्रत्येक गावातील नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा होईल यासाठी पाण्याचे नमुने तपासणे आवश्यक आहे. तसेच पूर आलेल्या गावांमध्ये स्वच्छता करावी, औषधसाठा पुरेसा ठेवावा व पशुधनासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. आपत्तीच्या काळात तालुका स्तरावर तहसीलदार, गट विकास अधिकारी व कृषी अधिकारी टीमवर्कने काम करतील. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी फील्डवर राहतील,अशा सूचनाही त्यानी दिल्या.

जिल्ह्यात २७ ते २८ सप्टेंबर दरम्यान वीजांचा कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान खात्याने पावसाचा यलो अर्लट जाहीर केला असून यापूर्वीच जिल्ह्यातून वाहणाऱ्या गोदावरी, भीमा, प्रवरा, मुळा, घोड, सीना, कुकडी व इतर नद्या पात्रातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विर्सग सुरू आहे. त्यातच आता पुन्हा मुसळधार पाऊस झाल्यास जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थिती निर्माण होवू शकते. यावेळी तातडीच्या उपाययोजना करण्याच्यादृष्टीने अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहणे आवश्यक आहे. यामुळे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी याबाबत तातडीने शुक्रवारी सायंकाळी आदेश काढत सर्व अधिकाऱ्यांना पुढील दोन दिवस त्यांच्या नेमणुकीच्या मुख्यालयी राहण्याचे आदेश काढले आहेत. कोणीही पूर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नयेत, या आदेशाचा कोणी भंग केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियमन २००५ मधील तरतुदीनूसार संबंधीतांवर कडक कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिला आहे.

## पुढील सहा दिवस जोरदार पावसाचे

व धाराशिव, लातूर, नांदेड तसेच उद्या रविवारी मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, छ. सं. नगर व पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्याचा घाटमाथा येथ जोरदार पावसाची शक्यता आहे. त्यानंतर सोमवारी व मंगळवारी (दि. २९ व ३०) परत मुंबई, पालघर, ठाणे, रायगड व नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्याचा घाटमाथा या ठिकाणी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर शुक्रवार ३ ऑक्टोबरपासुन पूर्णतः नव्हे, परंतु काहीशी उघडीपीची शक्यता जाणवते. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर उगम पावणाऱ्या महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यात मध्यम ते जोरदार पावसाच्या शक्यतेमुळे या नद्यांच्या धरणातून पात्रात पुन्हा एकदा पूर पाण्याच्या विसर्गाची शक्यता जावते, असे खुळे यांनी सांगितले.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी...

एक निवेदनही त्यांना सादर केले. त्यावेळी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठिशी आम्ही खंबीरपणे उभे राहू, असे आश्वासन पंतप्रधानांनी दिल्याचे फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांना कर्जमाफीबाबत आमच्या घोषणापत्रात आश्वासन दिले आहे. त्या आश्वासनाची पूर्तता आम्ही करू. त्यासाठी आम्ही समिती तयार केली आहे. ती कर्जमाफीच्या विषयावर अभ्यास करते आहे. कर्जमाफी वारंवार करता येत नाही, त्यामुळे त्याचा निर्णय काळजीपूर्वक करावा लागतो. तसेच खरीप हंगामासाठी घेतलेले कर्ज फेडण्याची वेळ पुढच्या वर्षी येणार आहे. शेतकऱ्याला आता तातडीची मदत हवी आहे. त्यामुळे आता मदत करावी लागेल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

**कोविड निधीतील एक पैसाही खर्च नाही**

दरम्यान, कोविड काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पीएम केअर फंडाप्रमाणे निधी तयार करण्याची परवानगी केंद्र सरकारने दिली होती. त्या काळात ६०० कोटी रूपये फंडात आले. पण त्यातील एकही पैसा खर्च करण्यात आला नाही. कोविडसाठीच तो फंड निर्माण झाल्याने कॅगच्या नियमानुसार ते पैसे इतर कारणासाठी वापरता येत नाहीत. त्याचे काय करायचे याचा प्रश्न आमच्यासमोर आहे. त्यामुळे यातील एक पैसाही न खर्च करणाऱ्यांनी आम्हाला काय शहाणपण शिकवावे? असा सवाल फडणवीस यांनी यावेळी केला.

## सार्वमत सुवर्ण महोत्सवानिमित्त...

२६ जानेवारी रोजी सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले. यानिमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. जानेवारी २०२६ पर्यंत राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमांत माध्यमिक वर्गातील शालेय विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या 'सार्वमत कलरफूल' या चित्र रंगभरण स्पर्धेचा समावेश आहे.

स्पर्धा ५ ते ७ वी आणि ८ ते दहावी अशा दोन गटात होणार आहे. स्पर्धेत सहभागासाठी शाळा व विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक असून प्रत्येक शाळेतून गटनिहाय १०० विद्यार्थ्यांची नोंदणी मर्यादा आहे. स्थानिक शाळास्तर नियोजनानुसार शाळेतच स्पर्धा होणार असून त्याच दिवशी निकालाची घोषणा व आकर्षक बक्षीसे प्रदान केली जाणार आहेत.

## श्रीरामपुरात पाच तलवारीसह...

जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्याकडील पथकातील पोसई समाधन सोळंके, उपनिरीक्षक श्री.सुर्यवंशी, पोलीस हेडकॉन्स्टेबल साळवे, पोना. संदीप दरंदले, पोलीस हेडकॉन्स्टेबल संभाजी खरात, श्री.कांतखडे, श्री.पटारे, श्री.वाघमारे, शिंदे, दुकळे, गिरी, म.पो.काँ. मुसमाडे यांनी केली. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेंद्र त्रिभुवन करीत आहेत.

## ७ ऑक्टोबरला पंचायत समिती...

आहे. यावेळी ईश्वरी चिठ्ठी त्यात्या पंचायत समितीच्या लोकसंख्येनुसार सभापती पदाचे आरक्षण ठरवणार आहे. आरक्षण सोडतीबाबत उपजिल्हाधिकारी महसूल यांच्यावतीने माहिती देण्यात आली. यात ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार ९ सप्टेंबरला नगर जिल्ह्यातील अकोले पंचायत समिती ही अनुसूचित जमातीसाठी आरक्षीत करण्यात आलेली आहे. तर उर्वरित १३ पंचायत समित्यांपैकी अनुसूचित जातीसाठी १ अनुसूचित जाती महिलेसाठी १, अनुसूचित जमाती महिलेसाठी १, नागरिकांचा मागासप्रवर्गासाठी २, नागरिकांचा मागासप्रवर्ग महिलेसाठी २, सर्वसाधारण प्रवर्ग ३ आणि सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी ३ असे आरक्षण काढण्यात येणार आहे. नगरला जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली हे आरक्षण काढण्यात येणार असून यावेळी ईश्वरी चिठ्ठीचा आधार घेण्यात येणार आहे. पंचायत समितीनिहाय काढण्यात येणाऱ्या आरक्षणासाठी नागरिकांनी हजर राहावे, असे आवाहन जिल्हा महसूल विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

**तुमचं ठरलं, आमचे काय? जिल्हा परिषद इच्छुकांचा सवाल**

जिल्हा परिषद अध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्याचवेळी पंचायत समिती सभापती पदाच्या आरक्षणाची संख्या निश्चित करण्यात आली असून त्यांच्या सोडतीची तारीख ठरली आहे. मात्र, जिल्हा परिषद सदस्य पदाचे आरक्षण रखडलेले आहे. अध्यक्ष पदाचे ठरलं आणि सभापतीपदाचे ठरले, आता आमचं आरक्षण कधी असा सवाल आता जिल्हा परिषद इच्छुकांकडून विचारण्यात येत आहे. दरम्यान, लवकरच जिल्हा परिषद सदस्य पदाच्या आरक्षणाची घोषणा होणार असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.